ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)
VOL. 7 | ISSUE 1 | FEBRUARY 2021


# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

*Special Issue on*

## GENDER EQUITY IN HIGHER EDUCATION

(Book III)



***Chief Editor***

**Dr. R. S. Funne**

*(Principal)*

***Issue Editors***

**Dr.J.M.Bochare | Dr.M.U.Khedekar**

२९. महिला सबलीकरण काळाची गरज
**डॉ.विजया साखरे | १५४**
३०. महात्मा ज्योतिराव फुले व महिला सबलीकरण एक चिकित्सा
**प्रा. सच्चिदानंद फुलचंद खडके | १६२**
३१. राजकारणातील महिलांचा दर्जा
**शेख कादर समंदर | १६५**
३२. राजकारणातील महिलांचे स्थान
**डॉ.पी.एस.लोखंडे | १७२**
३३. राजकीय क्षेत्रात महिलांचे योगदान
**डॉ.बोचरे जे.एम./ डॉ.काशिनाथ पल्लेवाड | १७५**
३४. स्त्री मुक्ती चळवळ आणि भारतीय स्त्री
**डॉ. काळे बी. एम | १७८**
३५. स्त्री सक्षमीकरण आणि मराठी स्त्रीवादी कथालेखन
**संजय तुकाराम निचिते | १८३**
३६. २० व्या शतकातील महिलांचे हक्क आणि सबलीकरण
**सुनिल सुधाकरराव सुर्यवंशी |डॉ. शिला स्वामी | १९१**
३७. उषा प्रियंवदा के साहित्य में नारी जीवन की समस्याएँ
**डॉ. खेडेकर मारोती उत्तमराव | १९५**
३८. हिंदी महिला उपन्यासकार के साहित्य में नारी
**प्रा. ठाकुर एस.पी. | २०२**
३९. महिला सशक्तिकरण और सामाजिक संस्कृति
**डॉ कुलकर्णी वनिता बाबूराव | २०६**
४०. मृदुला गर्ग की स्वयंनिर्णयी नारी : बदलते परिवेश का बोध
**डॉ. राजश्री भामरे | २११**
४१. डॉ. कुँअर बेचैन की गजलों में नारी विषयक संवेदनाएँ
४२. **डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश | २१७**
४३. हिंदी कहानियों में कामकाजी महिलाओं की समस्याएं एक दृष्टिक्षेप
**डॉ. डमरे मोहन मुंजाभाऊ | २२२**

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth

34

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# स्त्री मुक्ती चळवळ आणि भारतीय स्त्री

प्रा. डॉ. काळे बी. एम
मराठी विभागप्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविघालय, सोनपेठ ता.सोनपेठ जि. परभणी.

स्त्री जातीवरील अन्याय हा मानवजातीच्या इतिहासा इतकाच सनातन आहे. सेक्स, समाज आणि संस्कृती यांच्या पिढ्या न् पिढ्याच्यां धाकाने, आपल्या सोयी स्वार्थासाठी पुरूषांनी स्त्रियांना आपल्या इतके दडपणाखाली ठेवले की, दडपणाखालचे आयुष्य हेच स्त्रीचे नैसर्गिक आयुष्य असे स्त्रियांनाही वाटु लागले. बदलते समाजजीवन, विज्ञानाचा उदय व शिक्षणाने मिळालेला आत्मविश्वास, यामुळे आपला दुर्बल व पराधीन आयुष्याची जाणीव होत होत गेल्या चार-पाच दशकात स्त्रीया आपला आवाज उंचावू लागल्या आहेत. स्त्रियांच्या स्वातंत्र्य आणि समानतेचे लढे छोटया स्वरूपात गेल्या शतकाच सुरू झाले तरी अजुनही संघटितपणे स्त्रीवादी चळवळीनीं विश्वव्यापी जोर धरला आहे असे खणखणीतपणे म्हणता येणार नाही.

समाजाच्या इतिहासातील स्त्रीच स्थान पाहिल तर जगाच्या तुलनेत अमेरिकन स्त्री ही कित्येक बाबतीत अधिक नशीबवान होती असे म्हणावे लागेल, तरी सुध्दा मानव म्हणून आपले हक्क मिळवण्यासाठी मिळकतीवरचा हक्क, मतांचा हक्क मिळविण्यासाठी आमेरिकन स्त्रीयांनाच जास्तीत जास्त लढा दयावा लागला हे वास्तव आहे. 1863 च्या आधिपासूनच आमरिकन स्त्रीने स्व:ती ओळख पटवुन घ्यायला सुरूवात केली होती. या काळात उच्चशिक्षण घेण्याचा हक्क, करिअर करण्याचा हक्क, मतांचा हक्क यांची मागणी करणा-या स्त्रीयांची निर्भत्सना त्या काळात केली गेली स्त्रीचे स्वतंत्र, माणूस म्हणून असलेले अधिकार यासाठी लढा देताना अनेक आमेरिकन स्त्री कार्यकर्त्यांनी तुरुंगवास व हौतात्म पत्करलेले आहे. ही बायकांकडून किंवा लिंगअभावातून आलेल्या वैफल्यातुन आणि स्त्रीमध्ये असलेली प्रेम करण्याची शक्ती नसलेल्या बायकांकडुन उदयाला आली आहे असे या चळवळीत बद्दल आमेरिकेत बोलले जात होते.

स्त्रियांच्या परंपरातगत भुमिकेला चिकटुन राहणा-या सनातन्याबरोबर जुन्या पोथ्यापुराणातुन स्त्रियांच्या दुय्यमपणाचे दाखले देणा-या पोथीनिष्ठ

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



धर्मगुरूविरूध्दही स्त्रियांना लढावे लागले. 'द हेड ऑफ एव्हरी वुमन इज मॅन' किंवा ॲडम वॉज फर्स्ट बॉर्न देन इव्ह' अशासारख्या बायका अनैसर्गिक राक्षसिणी असुन परमेश्वराने स्त्रीला दिलेला सेवावृत्तीचा देनगी नष्ट करून या घरादाराची राखरांगोळी करत आहेत व पुरूषाला गुलाम बनवु पाहत आहेत अशा प्रकारचा प्रसार पोथीनिष्ट धर्मगुरूनी केला. मजेशीर गोष्टी अशी आहे की नव-याच्या दबावाखाली असणा-या व स्वातंत्र्य या कल्पनेलाच घाबरून, घर नामक तुरूंगात सुरक्षित राहू इच्छिणा-या सामान्य स्त्रियांचाच विरोध या चळवळीला झाला. त्यांना वाटायचे की लवकर लग्न व्हावे, चार तरी मुले असावीत, शहराच्या चांगल्या भागात सर्व सज्ज घर असावे. आरोग्य संपन्न कुटुंब, सुंदर व श्रीमंत नवरा, गुटगुटीत मुले, गाडी, सुसज्ज घर या पलीकडे स्त्रिची मागणी नव्हती. पत्नी व आई या पदाला समाजात मान होता. गाडया, कपडे, घरगुती उपकरणे यांची खरेदी, बाजार छाट यातच सामान्य स्त्रियां समाधानी होत्या. घर सुंदर सजवायचे ऑफिसला जाताना नव-याला बाय-बाय करायचा, पोरे स्वत: ड्रायव्हिंग करत शाळेत पोहचवायची, आल्यावर घराची कायम स्वच्छता ठेवायची, पाव घरी बनवायचे मुलांचे कपडे घरी शिवायचे, रोज पडदे बदलायचे आणि करिअरच्या मागे असणा-या माघच्या पिढीतील आपल्या आयाची किव करायची हे सामान्य अमेरिकन स्त्रिचे त्या काळात महत्वाचे वैशिष्टये होते.

आमेरिकेत स्त्री ही पुरूषापेक्षा वरच्या की खालच्या दर्जाची अशी चर्चा होत नसे तर स्त्री ही पुरूषापेक्षा वेगळी आहे हे त्या काळी समाजाने गृहीतच धरले होते सिमॉन द बोव्हाचे 'द सेंकड सेक्स' हे पुस्तक प्रसिध्द झाल्यावर एका आमेरिकन समीक्षाने 'या बाईला जीवन म्हणजे का हे जरासुध्दा माहित नाही आणि हे सगळे फ्रेंच बायकाबद्दल होते. अमेरिकेत असे प्रश्न आस्तित्वाच नाहीत' असे उद्गार काढले.

अमेरिकेत स्त्रीवादी चळवळीत स्त्रियांनी अमेरिकन स्त्रीच्या स्वातंत्र्याचा लढा उभारला 1674 मध्ये मार्गारेट ब्रिटेनने ने प्रथम मेरीलँड विधानसभेत स्त्रियांना स्थान व मताचा हक्क मिळवण्याची मागणी केली आणि ती अर्थात फेटाळण्यात आली. 1691 ते 1980 या काळात संपत्तीची मालकी असणाऱ्या स्त्रीयांना मॅसाच्युसेटमध्ये मताधिकार मिळाले 1830 ते 1840 च्या दरम्यान स्त्रियांना पूर्ण मत अधिकार मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न झाले पॉलीना राईट डेव्हीस् ल्युक्रेशिया मॉट, लुसी स्टोन, इर्नन्टाटन, एलिझाबेथ कॅण्डी स्टॅन्टन, मार्था राईट, मेरी ॲन

... Ganesh Warpudkar ACS College, Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist. Parbhani

मॅकलिन्टॉक इत्यादी स्त्रियांनी लढा उभारून अमेरिकेत स्त्रीला 1918 मध्येच पुरुषांच्या बरोबरीचे मत अधिकार मिळवून दिले.

या पार्श्वभूमीवर जेंव्हा आपण भारतीय स्त्रियांचा विचार करतो तेंव्हा भारतीय स्त्रियांना त्यांच्या अधिकारांची जाणीव होण्यास खूप कालावधी लागला. प्राचीन काळात धर्माच्या आडून स्त्रियांवर अनेक बंधने पुरुषप्रधान संस्कृतीत लादण्यास आले होते. 'चूल आणि मूल' हेच तिचे कार्यक्षेत्र होते. इतिहास व पुराणातुन स्त्रियां पुरुषांपेक्षा वेगळ्या काढलेल्या दिसतात. स्त्री ही एक न उकलणारे गुढ आहे अशा प्रकारचे वलय तिच्यासोबत तयार केले जाते. कारण ती एकाच वेळी सबला व आबला, कामुक व विरक्त, शरणागत व अंकुशधारिणी अशी दाखविली जाते, स्त्रीच्या चित्राणात धरत्रिच्या रूपाने मातेस्वरूप प्रतिमा, निसर्गाच्या रुपाने सर्जनशील प्रतिमा, देवीच्या रुपाने दुष्टांचा संहार करणाऱ्या शक्तीची प्रतिमा जशी येते तशी ती एक बाजूला चेटकीण, मंत्रिक हडळ, पुरुषांना मोहात पाडून त्यांच्या स्थलनाला कारणीभूत होणाऱ्या वीकारशील प्रकृतीची व दुसऱ्याबाजूला एकनिष्ठ, प्रवृत्तीता व कामरूप आयुष्यात तारून नेणाऱ्या अशा पत्नीची प्रतिमा येते.

सती सावित्री, सीता, द्रोपदी, कुंणती रंभा, मेनका, इ.कहाणी वाडमयातल्या स्त्रिया, कालिदासाच्या रतीप्रधान सौंदर्यावती नायिका, लढवय्या देवीच्या कथा इत्यादी सर्व चित्रणात भारतीय स्त्रीचा म्हणून परस्पराशी वेगळ्या असलेल्या प्रतिमा दिसतात. सद्गुणी, सदाचारी, प्रामाणिक, एकनिष्ठ प्रतिव्रता, उत्तम पत्नी प्रेमळ, गृहिणी, धर्म संभाळणारी, नीतीमान हे स्त्रीचे परंपरेने समजले जाणाऱ्या गुणांची अपेक्षा भारतीय समाजाने तिच्याकडून ठेवली आहे. आजही त्यात फारसा बदल झाला नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. स्त्रीची प्रतिमा ही परंपरेने निर्माण केलेल्या पुरुष प्रतिमेपेक्षा नेहमीच भिन्न व दुय्यम मानली आहे. स्त्री ही देवी असो रंभा असो वा चेटकीण, तिच्याभोवती एक गुंढ वलय आहे. साऱ्या जगावर विधान करता येईल. स्त्रीस्वभावाबद्दल मात्र काही बोलता येण कठीण आहे असे धर्मशास्त्र सांगते लैंगिक बाबतीतले पुरुषांचे दुटप्पी वर्तन, लैंगिक हिंसाचाराचे समर्थन बलात्कार व वेशा व्यवसायाचे समर्थन, बाईला मारण्याचे समर्थन, बायकीपणा व पुरुषीपणा याबाबतच्या सांकेतिक कल्पना या सगळयां मागे जुन्या पौराणिक प्रतिमांचा पगडा आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षण हे खेडोपाडी पोहोचले त्यामुळे स्त्रिया शिकू लागल्या शिक्षणामुळे त्यांना त्यांच्या अधिकारांची जाणीव झाली. समाजातील कार्यातील क्रियाशील सहभाग व शिक्षण या स्त्रियांच्या प्राथमिक

Late Ramrao ... ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



गरजा आहेत याची जाणीव स्त्रियांना 1960 नंतरच्या काळात होऊ लागली. पुरुषांच्या बरोबरीचे सर्व अधिकार कायद्याने मिळावे एका अर्थाने स्त्री आज 'मुक्त' आहे ती मते देऊ शकते. संस्था काढू शकते. इच्छित व्यवसाय निवडू शकते, याचा अर्थ या गोष्टी करण्यास आज कायद्याने आठकाही नाही पण नोकरीच्या ठिकाणी केले जाणारे भेदभाव बरोबरच्या पुरुष सहकार्याची- वर्तणूक कुटुंबातला समाजवाद, न संपणाऱ्या कौटुंब्रिक जबाबदाऱ्या, परंपरेने निर्माण केलेली लैंगिक प्रतिमा हे सर्व कायद्याच्या अडथळा पलिकडचे आहे.

आज लहान मुले सांभाळण्यासाठी पाळणाघरांची सोय आहे. नकोसे मूळ टाकण्यासाठी गर्भनिरोधकआची सोय आहे, घरकामाच्या जाचातून सुटण्यासाठीची सोय आहे, पण अजुनही समाजाची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी बदलत नाही. नाटक, सिनेमा, जाहिराती ज्यातून या तर तिचे गौण स्थान दिसतेच पण शरीर प्रदर्शनाच्या वृत्तीतून एक उपभोग्य वस्तू एवढीच तिची किंमत केली जाते. एखांदा हा टक्का स्त्रिाया सत्तास्थानांवर असतीलही, पण सर्वसाधारणपणे कारकून, शिक्षण, परिचारिका, स्वागतिका अशा दुय्यम स्थानांवर अधिक स्त्रिया आढळतात. आर्थिक स्वातंत्र्य मिळाले याचा अर्थ फक्त स्त्री कमवू लागली एवढाच, ती कमाई स्वतःच्या इच्छेप्रमाणे गोष्ट म्हणजे पुरुषी अहंकार किंवा अस्मिता याची जबरदस्त पकड आजही स्त्रियांवर आहे सेक्स ही दोघांनी मिळून उपभोगण्याची गोष्ट न राहता आजही पुरुषांनी स्त्रीवर मिळवलेला विजय आणि स्त्रीची पुरुषांकडे शारीरिक शरणागती होय परंपरागत भाव स्त्री पुरुषांच्या मनात घट्ट रोखून बसलेली आहे.

आज स्त्रियांनी स्वतःच्या 'गृहणी' च्या भूमिकेला ठाम नकार देणे. याचा अर्थ घर,संसार, नवरा ,मुले-बाळे सोडणे असा नव्हे घर, लग्न, आईपण त्यांच्याच बरोबरीने करियर ही तितकेच महत्त्वाचे व ती या गोष्टीबरोबर करता येते हे समजून घेणे महत्त्वाचे स्वतःला दिशा दाखवणारे दुसरे स्वयंशिक्षण म्हणजे विवाहसंबंधातील वास्तव समजून घेणे वैवाहिक संबंधांना फाजील महत्त्व व त्यातील शरणागतीची भूमिका सोडून देणे गरजेचे आहे. स्त्री जेंव्हा आपल्या क्षमतेला न्याय देणारी नोकरी शोधते, त्यासाठी हवे असलेले उच्च शिक्षण वा ट्रेनिंग घेते आणि जीवनभराचा गंभीरपूर्वक विचार-योजनेतून ते काम करते त्यावेळी फक्त समाजातील एक घटक व्यक्ती म्हणून ती महत्त्वाची ठरते. स्वागतिका, विक्रेती, व्यक्तिगत चिटणीस असा प्रकारच्या हलक्याफुलक्या नोकऱ्या स्त्रिया आपल्या क्षमतेची जाणीव न करून घेता स्वीकारतांना दिसतात घर, मुले, नवरा यांना आपण पूर्ण न्याय देऊ शकत नाही अशा अपराधीपणाच्या भावनेने स्त्रियांची नोकरीत

पूर्णपणे बांधीलकी राहण्यात आडथळे निर्माण होतात, पण स्त्रीला हे अडथळे ठामपणे पार करता आले पाहिजे.

त्याचबरोबर स्त्रीला स्वतःच्या सामर्थ्याबद्दल विश्वास हवा स्वतःला मिळणाऱ्या दुय्यम स्थानाचा निषेध करण्याची मानसिकता तयार हवी. घर ते बाहेरच्या जग या मोठ्या उडीत स्वतःचे सामर्थ्य व क्षमता नाकारण-या कोणत्याही घटकाशी दोन हात करण्याची तयारी हवी वेतन, संधी वागणूक इत्यादी बाबतीत जिथे स्त्रियांवर अन्याय होतो तिथे स्त्रीने आवाज उठवला उठवायला हवा पुरुषांशी माणूस म्हणून निकोप व स्पर्धा व्हावी, स्त्री म्हणून नको राजकारणात ही गृहिणी म्हणून नव्हे तर नागरिक म्हणून तिला स्थान मिळायला हवे.

संदर्भ ग्रंथ:-

१. समकालीन मराठी कविता : प्रकाश देशपांडे
२. स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन- डॉ. अश्विनी धोंडगे
३. मराठी लेखिका चिंता व चिंतन – डॉ. भालचंद्र फडके

❋❋❋❋

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani